# राज्याच्या भविष्याचे आधारस्तंभ

भारत जगातला सर्वात तरुण देश म्हणून आज ओळखला जात आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र हे देशातलं सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व इतर अनेक क्षेत्रात आघाडीवर असणारं राज्य आहे. परंतु याहीपुढे मजल मारायची असेल तर या तरुण मंडळींना योग्य वेळी योग्य ती दिशा मिळण्याची गरज आहे. कारण १५ ते २५ वर्षे वयोगटातली ही तरुण मंडळीच उद्याचे महाराष्ट्राचे शिल्पकार असणार आहेत. यासाठी त्यांना स्वतःला आधी घडवावं लागणार आहे. या तरुण पिढीला उद्यासाठी सक्षम करणारी एक गोष्ट असली तर ती म्हणजे शिक्षण आणि दुसरी म्हणजे त्यांचं करिअर! या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या विषयांकडे वेगळ्या दृष्टीने बघण्याची आज गरज आहे. कारण जागतिक परिस्थिती, काळ झपाट्याने बदलत चालला आहे. त्या कालानुरूप आपण आपले विचार व कार्यपद्धती बदलली तरच आपण येणाऱ्या काळावर आपला ठसा उमटू शकू.

यासाठी शिक्षण व करिअर याकडे अधिक डोळसपणे बघणं क्रमप्राप्त ठरतं. करिअर म्हणजे आर्ट्स, सायन्स, कॉमर्स किंवा फार फार तर मेडिकल-इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश असाच समज आपल्याकडे प्रचलित आहे. परंतु यापलीकडे जाऊन करिअर म्हणजे नेमकं काय, आपला नैसर्गिक कल-कुवत काय, आपली आवड काय, यावर आधारित आपल्याला कोणते पर्याय उपलब्ध आहेत, यशस्वी करिअर घडवण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरतात, यात शिक्षण, आपला दृष्टिकोन, आपल्यातली कौशल्यं आणि सवयी यांचा किती वाटा असतो, आपलं व्यक्तिमत्व आणि करिअर यांचा काय संबंध असतो, केवळ दहावी-बारावीच्या मार्कांच्या आधारावरच करिअरची दिशा न ठरवता व कशाला जास्त स्कोप आहे यामागे न जाता या प्रश्नांची उत्तरं डोळसपणे शोधली तर आपापल्या आवडीचं करिअर तर निवडता व घडवता येईलच परंतु त्यासोबत आपल्याला अपेक्षित यश, पैसा, प्रसिद्धी, समाधान, आनंद हे सर्वही मिळेल.

व्यक्तीच्या जीवनातल्या ठराविक काळासाठी प्रगतीची संधी असणारा व्यवसाय म्हणजे करिअर या पुस्तकी व्याख्येसोबत त्यात अजून बऱ्याच गोष्टींचा समावेश होतो. करिअरसंबंधी आपला स्वतःचा दृष्टिकोन काय आहे, त्यातून आपल्याला काय हवं आहे, हा विचार प्रत्येकाने केला तर करिअरची निवड करणं सोपं होईल. ज्या गोष्टीत आपली आवड आहे, आपला कल आहे ती गोष्ट साहजिकच आपण मन लावून करतो आणि म्हणून ती उत्कृष्टपणे केली जाते. जी गोष्ट मुळातच आपल्याला आवडत नाही ती करताना त्यात दर्जा नसतो, गुणवत्ता नसते आणि म्हणून त्याचं मूल्यही कमी असतं. उच्च कोटीचं यश मिळवण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

ज्या गोष्टीचा आपल्या करिअरशी अत्यंत जवळचा संबंध असतो ती म्हणजे शिक्षण. किंबहुना आपल्या आयुष्यभर चालणाऱ्या करिअरच्या प्रवासातला पहिला टप्पा म्हणजे त्या-त्या क्षेत्रातलं शिक्षण. गंमत बघा आपण आर्ट्स, सायन्स, कॉमर्स किंवा मेडिकल-इंजिनिअरिंग यालाच करिअर समजतो. हे निवडणं म्हणजे करिअर निवडणं नव्हे. त्याने फक्त करिअरची दिशा निश्चित होईल. याचसाठी वेगवेगळ्या माध्यमांमधून आपल्याला यासंबंधीची माहिती मिळवणं गरजेचं आहे.

कोणताही शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतरसुद्धा करिअरच्या असंख्य वाटा समोर दिसतात. त्यातली आपली वाट आपण निवडायची असते. प्रत्येक क्षेत्रात काही ठराविक करिअरच्या संधी असतात-उदाहरणार्थ प्रत्येक क्षेत्रातले शिक्षक, संशोधक, त्या-त्या क्षेत्रातलं व्यवस्थापन, तंत्रज्ञान, मार्केटिंग, उद्योग, त्या विषयांतल्या उपयोजित करिअरच्या संधी. त्यातही सरकारी, निमसरकारी व खासगी क्षेत्र, बहुराष्ट्रीय कंपन्यातल्या करिअरच्या संधी त्याचप्रमाणे त्या-त्या क्षेत्रातल्या स्वयंरोजगाराच्या व उद्योजकतेच्या संधी बऱ्याचदा आपण स्वतः स्वतःचं अवलोकन, मूल्यमापन तटस्थपणे करणं शक्य नसतं. अशावेळी इतरांची मदत घेणं फायद्याचं ठरतं. आज विज्ञानाच्या विविध चाचण्यांमार्फत अशा प्रकारचे निर्णय घेण्याची सोय उपलब्ध आहे ही समाधानाचीच बाब आहे.



संशोधनाअंती असं लक्षात आले आहे की यशस्वी किंवा चांगलं करिअर घडवण्यामध्ये त्या क्षेत्रातल्या शिक्षणाचा वाटा फक्त १५ टक्केच असतो. उरलेला ८५ टक्के वाटा हा तुमचा स्वतःकडे, जगाकडे व एखाद्या परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टिकोन, तुमच्यातली विविध कौशल्यं आणि तुमच्या सवयी यांचा असतो. यातल्या १५ टक्क्यांवर आपण जीव तोडून मेहनत घेतो परंतु ८५ टक्क्यांचं काय? या ८५ टक्क्यांवर काम करणारी कोणतीच यंत्रणा आपल्याकडे आजमितीला तरी नाही आणि त्यासंबंधीची जाणीव किंवा जागरूकताही नाही. या विषयावर मोठं काम होण्याची गरज आहे. शारीरिक व बौद्धिक गुणवैशिष्ट्यांनी मिळून आपलं व्यक्तिमत्व बनतं. आपण करणार असणाऱ्या करिअरच्या अनुषंगाने या गुणांचा जाणीवपूर्वक विकास करणंही शिक्षणाइतकंच महत्त्वाचं ठरतं.

आज कित्येक नवनवीन करिअर्स उदयाला येत आहेत. या आधीची पण काही भुरळ घालणारी करिअर्स आहेत. पण प्रश्न एकच आहे की आपल्याला ती कितपत पेलवणारी आहेत? त्यासाठी स्वतःकडे डोळसपणे पाहण्याचा प्रयत्नही व्हायला हवा व तशी सवयही आपण करायला हवी. आज ज्या युगात आपण जगतोय ते माहितीचं म्हणजेच संधीचं सुवर्णयुगच म्हणायला हवं. आपल्याला हवी ती माहिती थोड्याशा प्रयत्नांनी लगेच उपलब्ध होते.

खेळांमधल्या, कलाक्षेत्रातल्या, चित्रपटसृष्टीतल्या काही असामान्य करिअर्सवर नजर टाकली तर काही समान दुवे आपल्या लक्षात येतात.

आपला कल-आवड ओळखून केलेली करिअरची निवड.

चारचौघांसारखा मार्ग सोडून वेगळ्या वाटेने जाण्याची जोखीम.

इतरांबरोबर तुलना न करता स्वतःसाठी निवडलेला वेगळा मार्ग.

निवडलेल्या करिअरमध्ये अथक परिश्रम व सर्वोच्च कामगिरीचा ध्यास.

यशाबरोबर अपयशही पचवण्याची ताकद.

शक्य तेवढ्या लवकर म्हणजे कमी वयातच केलेली करिअरची निवड.

निवडलेल्या करिअरवर असामान्य निष्ठा व प्रेम.

अपेक्षित यश मिळेपर्यंत वाट बघण्याची तयारी.

मिळालेलं यश टिकवून ठेवण्यासाठी, नवनवीन यशाची शिखरं पादाक्रांत करण्यासाठी पुन्हा पुन्हा मेहनत घेण्याची तयारी.

थोडक्यात काय तर पारंपरिक विचारसरणीबरोबरच चौकटीबाहेरचा विचार करण्याची सवय या तरुण पिढीने अंगी बाणवली तर ही पिढी स्वतःच्या आयुष्याचे शिल्पकार तर होतीलच पण त्यापुढे जाऊन महाराष्ट्राचे व देशाचेही शिल्पकार ठरतील!

**- महेंद्र जी. बैसाणे**

(लेखक हे www.bharukaka.com या २४X७ अभ्यास, करिअर, व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन करणाऱ्या पहिल्या मराठी वेबसाइटचे संस्थापक आहेत)